CMYK

सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघात १२ मंडल अधिकारी, १८ तलाठी कार्यालयांसाठी ५ कोटींचा निधी मंजूर! >> पान 2

सुरक्षितता सर्वात महत्वाची, मात्र त्याकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष : अंबादास दानवेंची टिका >> पान 3

आ. सिद्धार्थ खरात यांनी शिवसैनिकांसह अनुभवला छावाचा थरार >> पान 4

**सुविचार**

आळस हा माणसाचा शत्रू असतो


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




हाच हिंदू जातीला लागलेला शाप...; छावा सिनेमानंतर सुरु झालेल्या वादावर शरद पोंक्षेंनी फटकारलं

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 198 ■ शुक्रवार, दि. 28 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## ‘गुनाट’ गावात पोलिसांचे सर्च ऑपरेशन

### डॉग स्कॉड, उसाच्या शेतातले पाण्याचे लोकेशनही ट्रेस

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी : स्वारगेट बस स्टँड बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेला पकडण्यासाठी शिरुरच्या गुनाट गावात पोलिसांचा ताफा पोहोचला आहे. सुमारे १०० पोलिस आणि पोलिस स्कॉड दत्ता गाडेच्या मागावर असून तो ज्या ठिकाणी लपून बसला आहे त्या ठिकाणाला पोलिसांनी घेराव घातला आहे. दत्ता गाडे ज्या शेतामध्ये लपून बसला असल्याची माहिती आहे त्या ठिकाणी पोलिसांनी मोठा फौजफाटा तैनात केला आहे. या भागात पोलिसांकडून ड्रोनचीही मदत घेतली जात आहे.**





दत्ता गाडे हा ज्या शेतात लपून बसल्याची माहिती आहे त्या ठिकाणी पोलिसांचे डॉग स्कॉड पोहोचलं आहे. दत्ता गाडे याने बुधवारी ज्या घरामध्ये पाण्याची मागणी केली होती त्या ठिकाणीही चौकशी करण्यात आली आहे. पाण्याअभावी आरोपी जास्त वेळ राहू शकणार नाही असा पोलिसांचा अंदाज आहे.

आरोपी ज्या ठिकाणी लपून बसला आहे त्या ठिकाणी त्याला पाण्याचा पुरवठा होऊ नये याची खबरदारी पोलिसांनी घेतली आहे. या शेतात ज्या ठिकाणाहून पाणी पुरवठा केला जातो त्या लोकेशनवर पोलिसांचा बंदोबस्त आहे. त्यामुळे आरोपी जर पाणी प्यायला आला तर पोलिसांना त्याला पकडता येईल.

आरोपी दत्तात्रय गाडे याने मंगळवारी पहाटे तरुणीवर बलात्कार केला. त्यानंतर तो शिरुर तालुक्यातील गुनाट या त्याच्या गावी गेला. गावातील कीर्तनाच्या कार्यक्रमात देखील तो सहभागी झाला. त्यानंतर बुधवारी >> पान २

## तरुणीने प्रतिकार न केल्याने आरोपीला गुन्हा करता आला : गृह राज्यमंत्र्यांचे तर्कट



**पुणे/प्रतिनिधी :** स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर अत्याचार झाल्याची बातमी पोलिसांनी बाहेर येणार नाही, याची जाणीवपूर्वक दक्षता घेतली होती. ही बातमी बाहेर आली असतील तर कदाचित आपल्याला आरोपीचे आता जे संभाव्य लोकेशन मिळाले आहे, ते मिळू शकले नसते. ही बातमी बाहेर आली असती तर आरोपी दत्तात्रय गाडे हा सावध होऊन लांब पळून गेला असता. त्यामुळे ही घटना लपवण्याचा प्रयत्न झालेला नाही. केवळ गुप्तता बाळगण्यात आली होती, असे स्पष्टीकरण गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. ते गुरुवारी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

## आरोपी दत्ता गाडेवर १ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर, तरुणीवर दोनदा झाला बलात्कार

**पुणे/प्रतिनिधी :** विद्येचं माहेरघर असलेल्या पुण्यात गेल्या काही दिवसांपासून विविध गुन्ह्यात वाढ होताना पाहायला मिळत आहे. पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात एका २६ वर्षीय तरुणीवर बसमध्येच बलात्कार केल्यानं राज्यभर खळबळ उडाली. या प्रकरणी आरोपी दत्ता गाडे हा फरार असून त्याच्यावर १ लाख रुपयांचं बक्षीस पोलिसांनी जाहीर केलं आहे. दत्ता गाडेनं या तरुणीवर बसमध्ये दोनदा बलात्कार केल्याचं तिच्या वैद्यकीय चाचणीतून स्पष्ट झालं आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे आरोप दत्ता गाडे हा इतर प्रकरणात जामिनावर बाहेर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. >> पान २

## गावच्या सरपंचानेच केला दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार, नाशिक जिल्ह्यात खळबळ



**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. गावच्या सरपंचानेच दोन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. ही घटना चांदवडच्या विटावे गावात घडली आहे. सरपंचाने मुलींच्या आजीच्या मदतीने या दोन अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळं परिसरात खळबळ उडाली आहे. पीडित मुलीच्या तक्रारीवरून सरपंच साईनाथ कोल्हे, संजय पवार व आजी संगीता आहीरे यांच्या विरोधात अनुसूचित जमाती प्रतिबंधक व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दोन अल्पवयीन मुलींवर आरोपीने त्र्यंबकेश्वर, नाशिक, शिर्डी, अहिल्यानगर व विटावे इथे शरीरसंबध केल्याचा आरोप आहे. तर संशयित आरोपीसोबत जाण्यास मुलींनी नकार दिल्याने आजीने दोघींना चावा घेत व शिवीगाळ दमदाटी व मारहाण करुन घरात कोंडून ठेवल्याची तक्रार पीडित मुलींनी दिली आहे. मनमाड विभागाचे पोलीस उपअधिक्षक बाजीराव महाजन हे स्वत: या घटनेचा तपास करीत आहेत.

## आलिबागमध्ये तणाव! दोन एसटी बसमध्ये चिरडून तरुणाच्या मृत्यूनंतर तुफान राडा; बस फोडल्या

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यामधील राज्य परिवहन महामंडळाच्या स्वारगेट डेपोमधील ’शिवशाही’ बसमध्ये तरुणीवर बलात्काराच्या घटनेनं महाराष्ट्र हादरुन गेला आहे. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध सुरु असून दुसरीकडे परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांच्या नेतृत्वाखाली आज आढावा बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातील परिवहन महामंडळाच्या डेपोंच्या सुरेक्षेचा मुद्दा या बैठकीत चर्चीला जाणार आहे. एकीकडे ही बैठक सुरु असतानाच दुसरीकडे अलिबागमधून राज्य परिवहन महामंडळाच्या दोन एसटी बसचा भीषण अपघात झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या अपघातानंतर मृत या ठिकाणी तोडफोड केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत वरिष्ठ निर्णय घेतील : अन्न आणि औषध प्रशासन मंत्री झिरवळ

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** मंत्री धनंजय मुंडे स्वतः म्हणतात मी,दोषी असेल तर, माझा राजीनामा घ्या, नाहीतर फासावर चढवा, तरीही विरोधक राजीनाम्याबाबत राजकारण करीत आहेत. याबाबत वरिष्ठ स्थरावरील मुख्यमंत्री आणि उमुख्यमंत्री निर्णय घेतील, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ म्हणाले की, नाशिक पालकमंत्री पदाचा तिढा सुटला पाहिजे, त्यामागे नाशिकचे अनेक प्रश्र्न निकाली निघतील. सरकार यावर लवकरच निर्णय घेईल. पुणे अत्याचार प्रकरणात राज्यात कायदा व सुव्यवस्था आहेच. मात्र, लोक विचित्र झाली आहेत. कुणासोबत फोटो असला म्हणजे तो जवळचा आहे असं नाही, फोटो कोणी पदावर असले किंवा एक मित्र म्हणून घेतला जातो. मेळघाट प्रकरणाबाबत माझ्या सोयऱ्यांसह सर्वांना विनंती आहे की, यासंदर्भात प्रबोधनाची गरज आहे.

मेळघाटातील आदिवासी अज्ञान आहेत. त्यांना सुज्ञान करण्याची गरज आहे. मेळघाटच्या प्रकरणासंदर्भात सरकारला आम्ही माहिती देऊ, सामाजिक संघटनांनी मेळघाट मध्ये जाऊन प्रबोधन करावे, असे आवाहन मंत्री झिरवळ यांनी केले. तसेच माणिकराव कोकाटे याआधी आमदार होते. वेगवेगळ्या पदावर त्यांनी काम केले आहे. मात्र, कोकाटे मंत्री होताच त्यांच्यावर आरोप सुरू झाले आहेत. आरोप सिद्ध झालेत तर राजीनामा द्यावा लागेल. छगन भुजबळ ओबीसींचे मोठे नेते आहेत.

सरकारमध्ये ॲडजेस्टमेंटला काही अडचण आली असेल म्हणून भुजबळ यांना थांबावे लागले असेल. छगन भुजबळ अजिबात नाराज नाहीत. ते नाराज आहेत हे केवळ लोकांमधून सांगितले जाते, छगन भुजबळ सर्व कार्यक्रमात हजर राहतात, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.





## स्वारगेटमधल्या घटनेची पूर्ण जबाबदारी सरकारने स्वीकारावी

**दैनिक आपला विदर्भ**

### शक्ती कायद्याची अंमलबजावणी करा– विजय वडेट्टीवार



**नागपूर/प्रतिनिधी :** पुणे स्वारगेट बस स्थानकात बसमध्ये घडलेल्या घटनेची संपूर्ण जबाबदारी सरकारने आणि तिथल्या यंत्रणेने स्वीकारली पाहिजे. बलात्काराच्या घटनेनंतर काही बसमध्ये आक्षेपार्ह साहित्यही मिळालंय. या बसचा वापर महिला शोषणसाठी होत होता का असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलाय. स्वारगेट बस स्थानकात २३ सुरक्षारक्षक असल्यावरही महिलेवर बलात्कार होतो. राज्याच्या गृहखात्याची रोज इब्रत वेशीवर टांगली जात असल्याची परिस्थिती आहे. या सगळ्या घटनेवरून महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था नसल्याचं दिसत असल्याचं विजय वडेट्टीवार म्हणालेत.

पुण्याला शिक्षणाचे माहेरघर म्हटलं जातं, परंतु सांस्कृतिक नगरी हे विशेषण लावून उपयोग होणार नाही, तर शक्ती कायद्याची कडक अंमलबजावणी त्वरित व्हावी. कायद्याचा धाक दिसावा, सरकारकडून अपेक्षा आहे, पण ते होताना दिसत नाही, असंही वडेट्टीवारांनी अधोरेखित केलंय. महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठीच शक्ती कायदा आम्ही आणला होता. मात्र, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सरकारने केलीच नाही, या सरकारला महिलांची चिंता नसल्याचं विजय वडेट्टीवार म्हणालेत. स्वारगेटच्या घटनेचा आम्ही विधानसभेवर प्रश्न उचलू, परंतु या घटना वारंवार घडत आहेत. सरकार या घटनांवर गंभीर आहे की नाही ? हा प्रश्न उपस्थित होतोय. आम्ही कारवाई करू, असं म्हणतायत, पण आरोपींना प्रत्यक्षात अद्याप अटक झालेली नाही. महिलांच्या शोषणाम ध्ये वाढ होत चालली आहे, असंही वडेट्टीवारांनी सांगितलंय.

या राज्यामध्ये एकूणच राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहिली तर गुन्हेगारांना सरकारकडून अभय दिल्यासारखं वाटत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केलाय. काही दिवसांपूर्वी माझ्या विरोधात भाजपाच्या लोकांनी आंदोलन केलंय. तर दुसरीकडे मात्र तो सोलापूरकर, तो कोरटकर, तो छिंदम याचा साधा निषेधाचा फलकही दिसला नाही. याचा अर्थ असा आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्यांना अभय द्यायचं का? तो आपल्या कुळातील आहे म्हणून किंवा तो आपल्या पक्षातील आहे म्हणून अभय द्यायचं का असा प्रश्न उपस्थित केलाय.

राज्य सरकारने वर्षभरात एक एक पालकमंत्री नेमावा, पहिला भाजपाचा, दुसरा राष्ट्रवादी आणि तिसरा शिवसेनेचा रोटेशन पद्धतीने पालकमंत्रिपदाची जबाबदारी वाटून घ्यावी. महाराष्ट्रात खो खो नावाचा खेळ प्रसिद्ध आहे, तो खो खो खेळ यांनी शिकावा, एकास बसवत जावे आणि दुसरे उठत जावे, अशा पद्धतीची टीका विजय वडेट्टीवार यांनी केलीय.

## अवैध रेती वाहतूक करणारे वाहन पकडले

### गजानन सुरोशे मंडळ अधिकारी यांची मालिका चालूच

**दैनिक आपला विदर्भ**

**■ महेबूब शेख**

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यात अवैध रेती माफिया वाढत असून अवैध रेती चोरून श्रीमंत होण्याच्या नादी अवैध रेती वाहन धारक पुष्पा स्टाईलने भर गर्दी च्या रस्त्यात वहान चालून भीती घालत आहे. याच बेलगाम अवैध रेती माफियाला वठणीवर आण्यासाठी मालिका चालू केली आहे. यात उमरखेड तालुक्याचे तहसीलदार यांनी इमानदार आणि प्रामाणिक मंडळ अधिकारी यांना नेमून वाळू माफिया यांची झोप उडवली आहे.यातच गजानन सुरोशे मंडळ अधिकारी यांना माहिती मिळाली की,२६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी गांजेगाव येथिल पैनगंगा नदिवर असलेल्या पुलावर रेतिचे वाहण भरणे सुरु आहे. यावरून त्यांनी गांजेगाचे ग्राम महसुल अधिकारी नामे ए. आर. शिंदे यांना याबाबत माहिती देऊन . आर.ए. भंडारे (ग्राम महसुल अधिकारी) वासुदेव जिंकूटवार (ग्राम महसुल सेवक) यु.के. राठोड (ग्राम महसुल सेवक) यांना सोबत घेवुन कार्यवाही करिता वरिष्ठांना माहिती दिली .

सायंकाळी पथकासह गांजेगाव रोडवर थांबून रेती वाहतूक पिकअप वाहण येत असतांना त्यांनी हाताचा ईशारा दाखवुन थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो न थांबता सरळ गांजेगाव येथिल कॅनलच्या कच्या रस्त्याने भर धाव वेगाने नेऊन तो सोईट महागाव रोडने जोरात वेगाने आणुन कृष्णापुरकडे जाणाऱ्या रोडवर गेला असता गजानन सुरोशे व त्यांच्या टिमने पाठलाग करून पिकअप वाहण हे कृष्णापुरच्या तलावाजवळ रोडवर थांबविले. >> पान २

CMYK

## राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्टयपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात. भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

# सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघात १२ मंडल अधिकारी, १८ तलाठी कार्यालयांसाठी ५ कोटींचा निधी मंजूर!

## ■ आमदार मनोज कायंदे यांच्या प्रयत्नांना यश
## ■ मंडल अधिकारी, तलाठ्यांना आता मिळणार नवीन कार्यालये

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**सिंदखेडराजा :** सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांची कामे जलद गतीने पार पाडण्यासाठी नवीन १२ मंडळ अधिकारी व १८ तलाठी कार्यालयाच्या इमारतींसाठी ४ कोटी ९४ लक्ष रुपयाचा निधी आमदार मनोज कायंदे यांनी मंजूर करून आणला आहे. त्यामुळे आ. कायंदे यांच्या धडाकेबाज कामाबद्दल मतदारसंघातून व विशेष करून महसूल प्रशासनातून त्यांचे कौतुक होत आहे.

शेतकऱ्यांची अतिशय महत्त्वाची कामे तलाठी कार्यालयाकडे असतात. त्यामध्ये सातबारा, फेरफार नोंदी, उत्पन्नाचे दाखले शालेय कामासाठी, श्रावण बाळ योजना, संजय गांधी योजना, ही कामे या कार्यालयामध्ये पार पडत असतात. जर गावामध्येच तलाठी कार्यालय असेल तर सर्वसामान्य माणसाचे कामे हे जलदगतीने व वेळेवर होईल. तसेच गावामध्येच मंडळ अधिकारी उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतरस्ते, पाणंद रस्ते खुले करून देण्यास मदत होईल, फेरफार मंजूर ही कामे गावामध्ये झाल्यामुळे प्रशासन व जनता यांची नाळ जुळेल.

> मंडल अधिकारी व तलाठी कार्यालये गावातच झाली तर त्याचा शेतकरी, ग्रामस्थांना फायदा होतो. पुढील काळातही ज्या विभागांना कार्यालये नाहीत, त्यांनासुद्धा कार्यालये उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील.
>
> **–मनोज कायंदे,**
> **आमदार, सिंदखेडराजा**



याचा फायदा सर्व सामान्य जनतेला होतो. त्यादृष्टीने मतदारसंघातील सर्वसामान्यांची कामे ही गावामध्येच वेळेत व गतीने व्हावी, यासाठी येत्या काळात इतरही ज्या ज्या विभागांना कार्यालय उपलब्ध नाहीत त्यांनासुद्धा कार्यालय करून देण्याचा प्रयत्न राहील, असे प्रतिपादन यानिमित्त आ. मनोज कायंदे यांनी केले आहे.

# शिरपूर येथे महाशिवरात्री यात्रे निमित्त घेतला लाखो भाविकांनी महाप्रसाद




**दैनिक आपला विदर्भ**

**शिरपूर जैन/प्रतिनिधी :** येथील जानगीर महाराज संस्थानमध्ये महाशिवरात्री उत्सवानिमित्त २६ फेब्रुवारी रोजी पोळ्या,वांग्याची भाजी या महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम पार पडला. या निमित्त संस्थान मध्ये संत महंताासह भाविकांची मांदियाळी पहायला दिसली. शिरपूर व परिसराचे आराध्यदैवत असलेल्या जानगीर महाराज संस्थानमध्ये २० फेब्रुवारी पासून महाशिवरात्री उत्सवाला प्रारंभ करण्यात आला होता.

या निमित्त संस्थांनमध्ये श्रीमद् भागवत कथा, हरी किर्तन, काकड आरती, प्रवचन, अन्नदान असे कार्यक्रम पार पडले. २६ फेब्रुवारीला महाशिवरात्रीनिमित्त संस्थानमध्ये दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती, तर शनिवार २७ फेब्रुवारीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाप्रसादासाठी शिरपूरसह परिसरातील गावांतील महिलांनी घरी कणिक नेऊन गव्हाच्या पोळ्या तयार केल्या, तर वांग्याची भाजी संस्थानमध्ये गावकऱ्याच्या हस्ते तयार करण्यात आली होती. परंपरेनुसार प्रथम या महाप्रसादाचा नैवेद्य हजरत मिर्झा बाबा दर्गाहमध्ये अर्पण करण्यात आला. त्यानंतर जानगीर महाराज संस्थानमध्ये जिल्ह्यातील संत महंत यांच्या उपस्थितीत संस्थानचे चौथे मठाधिपती महेशगिर बाबा यांच्या मार्गदर्शनात उपस्थित भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला.

या महाप्रसादाचा लाभ स्थानिक यांच्यासह हजारो भाविकांनी भक्तांनी घेतला. महाशिवरात्री उत्सवाची सांगता शुक्रवारी भव्य शोभायात्रेनंतर होणार आहे. जानगीर महाराज संस्थानमधून निघणाजया पालखी शोभायात्रेत विदर्भ व मराठवाड्यातील शेकडो भजनी दिंड्या व भाविक सहभागी होणार आहेत.

पालखी शोभायात्रेतील भाविकासाठी जागोजागी अल्पोपहाराची व भोजनाची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. भाविकांसाठी शुद्ध पाण्याची सुविधा महाशिवरात्री निमित्त दरवर्षीप्रमाणे विविध सामाजिक संघटनांसह, पतसंस्था, बँक,डॉक्टर, मेडिकल संघटना, गणेश मंडळ व दूर्गा मंडळांनी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती.

## हाच हिंदू जातीला लागलेला शाप...; छावा सिनेमानंतर सुरु झालेल्या वादावर शरद पोंक्षेंनी फटकारलं

**मुंबई/प्रतिनिधी :** 'छावा' चित्रपट संपूर्ण देशभरात गाजतोय. चित्रपटावर फक्त प्रेक्षकच नाहीतर, समिक्षकांकडूनही 'छावा'वर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अभिनेता विक्की कौशलनं चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे, त्यामुळे त्याच्या कामाचं कौतुक होतं आहे. एकीकडे सिनेमाचं कौतुक होतंय, तर दुसरीकडे सिनेमाबद्दल सोशल मीडियावर अनेक वाद निर्माण झालेत. याच वादाविषयी आता अभिनेते शरद पोंक्षे यांनी परखड मत मांडलं आहे. अभिनेते शरद पोंक्षे नेहमीच आपलं परखड मत मांडत असतात. अशातच आता 'छावा' चित्रपटावरुन निर्माण झालेल्या वादासंदर्भातही त्यांनी इन्स्टाग्रामवरुन एक व्हिडीओ शेअर करुन आपलं मत मांडलं आहे. शरद पोंक्षे म्हणाले की, ''नमस्कार, छावा चित्रपट प्रदर्शित झाला आहे आणि सगळा हिंदू समाज, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर नितांत प्रेम करणारे सगळे अचानक एकवटले. हिंदूंना एक होण्यासाठी काहीतरी कारण लागतं. आपण सगळे एकवटलो, सिनेमा सुरू झाला, सिनेमा खूप चालायला लागला आणि त्याच्यावर वाद-विवाद सुरू झाले. मग वंशजांनी आक्षेप घ्यायला सुरुवात केली. दोन्हीकडून वाद-प्रतिवाद सुरू झाले. म ारामारी सुरू झाली. भांडणं सुरू झाली. पण या सगळ्या भानगडीम ध्ये एक गोष्ट मात्र राहूनच गेली. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांवर अनन्वित अत्याचार करून जे हाल केले, म्हणजे, क्रूरतेचं शेवटचं टोक गाठलं तो औरंग्या मात्र बाजूलाच राहिला.'' ''खरंतर सिनेमा बघितल्यानंतर जसं सगळ्या महाराष्ट्रात सध्या काही घडलं तर एखाद्या नेत्याच्या फोटोवर चप्पला वगैरे मारतात, थुंकतात, असे प्रकार घडतात. तसंच खरंतर औरंगजेबाच्या प्रतिम ेवरती चप्पला मारायला हव्या होत्या. त्याचे पुतळे ठिकठिकाणी महाराष्ट्रात, हिंदूस्थानमध्ये जाळले जातायत, असं चित्र दिसायला हवं होतं. दिसलं काय? मराठा विरुद्ध ब्राह्मण समाज. मराठे म्हणणार, आमचे पूर्वज असे नव्हते. तुमच्या ब्राह्मणांनी छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराजांना मारलं. मग ब्राह्मण म्हणणार, आमच्याकडे दोन-चार होते. तुमच्या मराठ्यांनी छत्रपती शिवाजी आणि संभाजी महाराजांचं नुकसान केलं. ते जास्त गद्दार होते. मग मराठे म्हणणार, तुम्हीच सत्यानाश केलाय. नंतर ब्राह्मण म्हणणार, तुम्हीच सत्यानाश केला. या सगळ्या भानगडीत एक विसरून जातोय औरंग्या बाजूलाच राहतोय.''

# वाल्मिक कराडसह ८ आरोपींविरोधात सीआयडी दाखल करणार १४०० पानी चार्जशीट

## मोठे गौप्यस्फोट होण्याची शक्यता

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती झाल्यानंतर तपासाची सूत्रे वेगाने फिरली आहेत .या प्रकरणात आता मोठी बातमी समोर येत असून संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज वाल्मिक कराडसह इतर ८ आरोपींच्या विरोधात सीआयडी १४०० पानांचे आरोपपत्र दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली .बीडच्या विशेष मकोका कोर्टात आज हे आरोपपत्र दाखल केलं जाणार आहे. या आरोप पत्रात मोठे गौप्यस्फोट होणार असल्याची माहिती आहे.

९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष देशमुख यांचा अपहरण करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. आवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीतून पुढे ही हत्या झाल्याचे समोर आले . या हत्येची सुरुवात ज्या खंडणी प्रकरणातून झाली होती ,त्या खंडणी प्रकरणापासून अपहरणाच्या प्रकरणापर्यंत तपास सीआयडीच्या हाती होता. खूनाचा तपास डखढ कडे आहे. त्यामुळे सीआयडी कडून दाखल करण्यात येणाऱ्या १४०० पानी आरोपपत्रात नक्की काय उलगडे होतात हे महत्त्वाचं ठरणार आहे .

काय असेल आरोप पत्रात ?

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज सीआयडी बीडच्या विशेष मकोका कोर्टात वाल्मीक कराडसह ८ आरोपींच्या विरोधात एक आरोप पत्र दाखल करणार आहे .हे साधारण १४०० पानांचे आरोपपत्र खंडणी प्रकरण आणि अपहरणाच्या प्रकरणात मोठे उलगडे आणि गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे .या आरोप पत्रात वाल्मीक कराड ,विष्णू चाटे ,सुदर्शन घुले ,प्रतीक घुले,जयराम चाटे कृष्णा आंधळे सुधीर सांगळे सिद्धार्थ सोनवणे यांच्या विरोधात असलेले पुरावे आणि गुन्ह्यातला सहभाग या संदर्भातले पुरावे आहेत . बीडच्या विशेष मकोका कोर्टात ही चार्जशीट दाखल होणार असून साक्षीदारांचे जबाब ,खंडणी प्रकरणात मुख्य सूत्रधार कोण ?आरोपींना फरार होण्यासाठी कोणी मदत केली ?आरोपींना आर्थिक मदत कोणी केली या महत्त्वाच्या प्रश्न्नांचा उलगडा होण्याची शक्यता आहे .

पान १ वरून...

### 'गुनाट' गावात पोलिसांचे

सकाळपर्यंत तो गावातच होता. मात्र दुपारी माध्यमांमधून त्याचे फोटो आणि नावासह बातम्या सुरु झाल्या तेव्हा तो गायब झाला.

दत्ता गाडेचे राजकीय कनेक्शन?

स्वारगेट अत्याचार प्रकरणातील फरार आरोपी दत्तात्रय गाडेचं राजकीय कनेक्शन असल्याची चर्चा सुरू झालीय.. आणि ही चर्चा सुरू होण्याचं कारण म्हणजे, अजित पवारांच्या आमदाराच्या फ्लेक्सवर झळकलेला गाडेचा फोटो. शिरुरचे माजी आमदार अशोक पवार यांच्या वाढदिवसानिमित्त लावलेल्या फ्लेक्सवर, दत्ता गाडेचा फोटो झळकलाय.शिवाय शिरुर हवेली विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार माऊली कटकेंसोबत आणि त्यांच्या फ्लेक्सवरही आरोपीचे फोटो झळकले. त्यामुळे नराधम गाडे हा आमदार माऊली कटकेंचा कार्यकर्ता असल्याचा आरोप होतोय. याबाबत स्वत: आमदार कटकेंनी स्पष्टीकरण दिलं.

### आरोपी दत्ता गाडेवर १ लाख

नराधम दत्ता गाडेवर १ लाखाचं बक्षीस जाहीर : याबाबत पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील म्हणाल्या की, ''१३ पथकांकडून आरोपी दत्ता गाडे याचा शोध घेतला जात आहे. रेल्वे स्टेशन, बस स्टँड या ठिकाणी आरोपीचा शोध घेतला जात आहे. त्याच्या कुटुंबीयातील अनेकांची बुधवारी चौकशी करण्यात आली आहे. आरोपीला पकडण्यासाठी १ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. याबाबत आरटीओ अधिकाऱ्यांची सुद्धा बुधवारी भेट घेतली. तसेच पीडित तरुणीचा मेडिकल अहवाल प्राप्त झाला आहे. पण त्यावर बोलणं उचित नाही,'' असं यावेळी त्यांनी सांगितलं.

दत्ता गाडेनं बसमध्ये तरुणीवर दोनदा केला बलात्कार : या प्रकरणी पीडित तरुणीचा वैद्यकीय तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. लैंगिक अत्याचार झाल्याचं वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झालं आहे. बुधवारी संध्याकाळी ससून रुग्णालयानं पोलिसांना वैद्यकीय अहवाल दिला. त्या अहवालात आरोपी दत्ता गाडेनं दोनदा तरुणीवर बलात्कार केल्याची माहिती समोर आली आहे.

### अवैध रेती वाहतूक करणारे

त्या वाहणाची पथकांने पाहणी केली असता. त्यात रेती भरून मिळुन आली सदर वाहण चालकास पथकाने महसुलचे भरारी पथक असल्याचे सांगितले असता वहाण चालकास त्यांचे नाव विचारले असता त्यांने त्याचे नाव सुनिल कदम वय (४५ )रा. ढाणकी असे सांगितले सदर वाहण चालकास रेती बाबत रेती वाहतुक परवाणा आहे का विचारणा केली असता वाहण चालकांनी रेती वाहतुक करण्याचा परवाणा नसल्याचे सांगितले त्यावरून महसूल पथकांने सदर वाहण क्र.एम. एच.२८ एच. ७४९३ मध्ये आर्धा ब्रास रैती त्याची किंमत ३०००/ रुपये व वाहणाची किंमत अंदाजे ९०,०००/ रुपये असा एकुण मुद्देमाल ९३,०००/ रुपयेचा जप्त करून ढाणकी पोलिस चौकी येथे आणून नमुद ईसम नामे सुनिल कदम वय( ४५ ) रा. ढाणकी कृत्य कलम ३०३(२) भा. न्या. सं. सहकलम १ सहकलम १५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ प्रमाणे होत असल्याने त्यांचे विरुध्द कायदेशिर पोलीस कार्यवाही केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सुरक्षितता सर्वात महत्वाची, मात्र त्याकडे सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष : अंबादास दानवेंची टिका

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** दीड हजार रुपये देऊन महाराष्ट्र धन्यता मानतो. मात्र, महिलांची प्रतिमा मलिन होते की काय अशी प्रतिमा तयार होत आहे. पुण्यात एका भगिनीवर बसमध्ये अत्याचार होतो. ही नुसती घटनाच घडली नाही. ज्या पद्धतीने परिसरात घाणेरडे साहित्य पडले होते. हे पाहता प्रशासन सरकार कसे काम करते हे समोर येते.सरकार आणि कायदा याचा धाक दिसतो का? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सुरक्षितता सर्वात महत्वाची आहे. मात्र, त्यावर शासनाचे दुर्लक्ष आहे. असा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनचे नेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

यावेळी पुढे बोलताना दानवे म्हणाले की, हा आरोपी शिरूर जवळील एका गावातील रहिवाशी आहे. हा आरोपी सत्ताधारी राजकीय पक्षाचा कार्यकर्ता आहे. उज्जैन येथे काही लोकांना घेऊन गेला होता. एसटीची संपूर्ण यंत्रणा असताना ही कसे घडले.असा प्रश्न आहे. आरोपी अटक होत नाही हे महाराष्ट्रच दुर्दैव आहे. मसाजोगचे आरोपी देखील सापडत नाहीत. सुरक्षितता सर्वात महत्वाची आहे. मात्र, त्यावर सरकारचे दुर्लक्ष आहे, अशी परिस्थिती महाराष्ट्राची आहे. आरोपी स्वतः बोलतो मात्र, त्याला पोलिस पकडत नाही. हा कुणाचा कार्यकर्ता आहे. सत्ताधारी पक्षातील लोक धमक्या देत आहेत. बलात्कार करीत आहेत. त्यामुळे हा सरकार कुणाचा असा सवाल आता जनता करीत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी फरार आहेत.

आरोपी कडे सर्वात जास्त पुरावे आहेत, म्हणून हा आरोपी येऊ नये असे आहे का?असा प्रश्न निर्माण होत आहे. पोलिस कोठडीत आरोपीला भेटायला दुसरे लोक जातात. आणि संतोष देशमुख यांचे बंधू पोलिसांना भेटायला गेले तर त्यांना धाक दाखवला जातोय. धनंजय मुंडे यांचा वाल्मीक कराड या लोकांना सपोर्ट आहे.नाशिक पालकमंत्रीपदाबाबत व्यवस्थित स्वतःच्या पारड्यात कसे पडेल हे भाजप पहाते. भाजप यांच्यात झुंज



लावून स्वतःच साध्य करेल. तुम्ही ओएसडी ठरवतात आणि पालकमंत्री निवडण्याची निर्णय क्षमता मुख्यमंत्री मध्ये नाही का? असा प्रश्न यावेळी दानवे यांनी उपस्थित केला. उज्वल निकम हे वकील आहे. ते आपल्या व्यवसायाशी बेइमानी करणार नाही. असा विश्वास आहे.

नमिता मुंदडा डॉक्टर असेल म्हणून धस एवजी त्यांची समितीवर नियुक्ती झाली असावी. फक्त महादेव मुंडे नाही तर,बीड परिसरातील सर्व घटनांचा तपास व्हायला पाहिजे. मराठवाडामधील अनेक पाणी पुरवठा योजनेत दुजाभव आहे. १४ मोठ्या योजना आहे.मात्र, स्रोत उपलब्ध नाहीत.फक्त १ योजना पूर्ण होऊ शकते. मात्र, १३ योजना पूर्ण होणार नहीं अशी परिस्थिती आहे. नामदेव ढसाळ हे महाराष्ट्राचे क्रांतिकारी नेते आहेत. सर्व सामान्य माणसाचा आवाज जनतेसमोर आणला आहे.

ते थोर साहित्यिक कवी आहेत. तरुणांच्या मनामध्ये, शरीरामध्ये मनगट शरीर आणि मनामध्ये ज्वाला निर्माण करणार आहे. त्यामुळे ते सेन्सर बोर्डाला आवडल नसेल. नामदेव ढसाळ सेन्सर बोर्डाला माहिती नाही तर हे सेन्सर बोर्ड कोण. हा नामदेव ढसाळ आणि मराठी भाषेचा अवमान आहे. ते या माध्यमातून सरकार करत आहेत.

पोलिसांना आरोपी भेटत नाही, सरकार फरार करते की काय? येत्या अधिवेशनात हा विषय उचलणार आहे. ग्रामाचायत संगणक चालकांना पगार मिळत नाही. संगणक चालक यांच्या मध्यातून मोठा भ्रष्टाचार होतो. त्याच्या वेतनात कपात केली जाते. त्यांना सहा महिन्याचा पगार मिळाला पाहिजे. छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी आज अचानक पणे शहरातील सिडको बस स्थानकावर पाहणी केली. यावेळी त्यांनी बस स्थानक परिसरात असलेल्या पोलीस चौकीला भेट दिली, पण या चौकीत एकही पोलीस कर्मचारी हजर नसल्याचं समोर आले आहे. त्यामुळे संतापलेल्या शिरसाट यांनी थेट पोलीस आयुक्तांना फोन लावून याबाबत तात्काळ कारवाई करण्याची सूचना केली. दरम्यान शिरसाट यांच्याशी बातचीत केली आहे. अशी माहिती अंबादास दानवे यांनी बोलताना दिली.

## प्रशांत कोरटकरच्या घरावर कोल्हापूर पोलिसांचा छापा

**नागपूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलून इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अलि शिवीगाळ करणाऱ्या तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याच्या घरावर कोल्हापूर पोलिसांनी छापा घातला. मात्र, कोरटकर हा घरी मिळून आला नसून त्याने दोन दिवसांपूर्वीच नागपुरातून पलायन केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी नुकतेच छावा चित्रपटावर आपली भूमिका मांडली होती. ही भूमिका मांडत असताना त्यांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केल्याचा आरोप करीत तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याने फोन करून थेट धमकी दिली, असा दावा सावंत यांनी केला आहे. याबाबत सावंत यांनी एक कॉल रेकॉर्डिंग फेसबुकवर शेअर केली आहे.

## जनता मटण दारू पैंश्याने विकली

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** देशमुख कुटुंबियांना पाहिजे तो वकील निवडला पाहिजे आणि शासनाला कळवले पाहिजे. मग आम्हाला शासनाला बोलता येईल. शासकीय वकील तुम्ही देऊ नका. देशमुख कुटुंबीयांनी निकम यांची मागणी केली असेल तर, ती योग्य आहे. पण त्यांनी मागणी केली हे मला माहीत नव्हत. अस वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. अड्.प्रकाश आंबेडकर आज नांदेडला कार्यक्रमासाठी आले असता ते माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.

यावेळी बोलताना अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, स्थानिक स्वराज्य निवडणुक लांबणीवर पडल्या असून कोर्टाला जेंव्हा निकाल द्यायचा तेंव्हा ते देतील. निवडणुका झाल्या पाहिजेत, त्या घेतल्या पाहिजेत आणि ते घेण्याची जबाबदारी हे राज्याच्या इलेक्शन कमिशनवर आहे. दुर्दैवाने मी असे म्हणेल की,त्यांनी इलेक्शन नाही घेतले तर, त्यांच्यावर काय करवाई व्हावी याची कुठंच तरतुद नाही. म्हणून आम्ही पिटीशन दाखल केले की, यांनी जर योग्य वेळेस इलेक्शन घेतले नाही. तर, देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. दुर्दैव असे म्हणावे लागेल की,लॉर्डशिप कुलकर्णी यांच्याकडे ते हेरिंग ला गेले आणि त्यांनी ते खारीज केले. खारिज केल्यानंतर मार्ग काहीच नाही. स्वारगेट मधील घटना केवळ स्वारगेटमध्ये नाही तर,अनेक ठिकाणी झाल्या आहेत. बस स्टॅन्डच नाही तर, कुठलाही एरिया सुरक्षित नाही. त्याच कारण म्हणजे हे ज्या पद्धतीने महिलांच्या बाबतचा प्रचार करताय, उपभोगाची वस्तू म्हणून,भाजप तत्वज्ञान सांगत आहेत. त्यातून अशी मानसिकता डेव्हलोपमेंट होणारच आहे. राहुल गांधी यांची अवस्था वाघा हून मांजर अशी अवस्था मोदी यांनी केली आहे.

**अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकीय परिस्थितीवर प्रतिक्रिया**



उडते उठ बसते बस अशी अवस्था करून ठेवली आहे. मोदी ने सरळ सांगितले तोंड उघडल्यास तिहार जेल मध्ये टाकेल.स्वतः साठी की तुमच्या साठी लढेल. इथं असलेल्या गोष्टी राहुल गांधी यांनी वाऱ्यावर सोडले. आपले डोकं आपल्या खांद्यावर राहिले पाहिजे.आपली मान दुसऱ्याच्या खांद्यावर असता कामा नये. कधी सुरी फिरेल हे कळत नाही. दोन्ही बाजूने संकट आहे. एक व्यवस्थेने दिलेली सुरक्षितता काढण्याचा भाग सुरु आहे आणि दुसरे राज्य आणि केंद्रात सत्तेत बसलेले म्हणत आहेत. आम्ही या देशाच संविधान बदलू. तुमचं राहील काय..आरक्षण विरोधात काँग्रेस शरद पवार यांची राष्ट्रवादी भाजप आरएसएस हे विरोधी आहेत. त्यागाची भूमिका करायची असेल तर, आमचे मत आता त्यांना नाही. हे निश्चय झाला पाहिजे. फुले शाहू आंबेडकरी जनता मटण दारू पैश्याने विकली आहे. अशी परिस्थिती झाली आहे. फुले शाहू आंबेडकरची मशाल बिन बिनता दिवा झाल्याच दिसत आहे. ज्या दिवशी ही मशाल पुन्हा पेटलेली दिसेल तेव्हा संविधान बदलणारे तुमच्या कडे गिरगिड्याहून बोलतील. ही ताकद पुन्हा उभ करावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

## माजी लोकप्रतिनिधीकडून पदनामाचा गैरवापर

### सामाजिक कार्यकर्ता जितेंद्र एन. जैन यांची मुख्यमंत्र्यांनकडे तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** माजी लोकप्रतिनिधी कडून पदनामांचा गैरवापर केला जात असून त्यांना पदनामाचा योग्य वापर करावा याबाबत निर्देश द्यावे, अशी मागणी बुलडाणा येथील सामाजिक कार्यकर्ता जितेंद्र एन. जैन यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे की, माजी लोकप्रतिनिधी, जसे की माजी आमदार, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी सरपंच, किंवा माजी पंचायत समिती सभापती, आपल्या नावासमोर माननीय किंवा मा. असा उल्लेख करीत करतात, त्यांच्याकडे सध्या कोणतेही पद नसले किंवा निवडणुकीत पराभूत झाले असले तरी. ही प्रथा चुकीची असून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणारी आहे. माजी पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या नावासमोर फक्त माजी असे उल्लेख करावे व मा. हे पदनाम वापरणे टाळावे. उदा. मा. आमदार, मा. अध्यक्ष जि.प., मा. सभापती इत्यादी माजी आमदार, माजी सभापती असे लिहावे. जर कोणी याबाबत निर्देशांचे पालन करीत नसेल, तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारच्या गैरवापरामुळे संबंधितांवर आयपीसी कलम ४२० (फसवणूक) किंवा भारतीय न्याय संहितेच्या अन्य संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचा विचार करण्यात यावा. प्रसिद्धी देतांना आजी-माजी असा स्पष्ट उल्लेख असावा.सदर समस्या राज्यातील लोकशाही प्रक्रियेस व विश्र्वासार्हतेस बाधा आणू शकते, त्यामुळे याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्याकडून योग्य ती कार्यवाही, करावी अशी मागणी बुलढाणा येथील सामाजिक कार्यकर्ता जितेंद्र एन. जैन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



## कल्याण आरटीओ आणि वाहतूक पोलिसांची अनोखी जनजागृती

### अपघातग्रस्तांची वेशभूषा करून वाहनचालकांना दिला धडा

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पश्चिम येथे वाहतूक नियमांचे पालन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी आरटीओ आणि वाहतूक पोलिसांनी अनोखी जनजागृती मोहीम राबवली. वाहतुकीचे नियम न पाळल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देण्यासाठी, अपघातग्रस्ताची वेशभूषा करून वाहनचालकांना धडा शिकवण्यात आला. यावेळी नो रिल्स, ओन्ली रुल्स असा संदेश देत नागरिकांना वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

कल्याण पश्चिम परिसरातील सिग्नलवर वाहनचालकांना वाहतूक नियमांची जाणीव करून देण्यासाठी आरटीओ आणि वाहतूक पोलिसांनी अभिनव उपक्रम राबवला. यामध्ये अपघात झाल्यानंतर जखमी झालेल्या व्यक्तीची वेशभूषा करून वाहनचालकांना दाखवण्यात आले की, नियम तोडल्यास अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. या अभिनव प्रयोगाने अनेक वाहनचालक आणि प्रवाशांचे लक्ष वेधले. अपघातग्रस्त व्यक्तीच्या रूपात असलेल्या कर्मचाऱ्यावर दवाखान्यात सुरू असलेल्या उपचारांचे चित्र उभे करण्यात आले. शरीरावर असंख्य पट्ट्या गुंडाळलेल्या अवस्थेत त्या व्यक्तीने वाहनचालकांना समजावून सांगितले की, वाहतूक नियम मोडल्यास गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. यासोबतच, वाहतूक पोलिसांनी नो रिल्स, ओन्ली रुल्स, वाहतुकीचे नियम पाळा आणि अपघात टाळा असे विविध बॅनर हातात घेऊन जनजागृती केली. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्यास प्रवृत्त करणे हा होता. वाहतूक पोलिस आणि आरटीओच्या या अनोख्या उपक्रमाचे



वाहनचालक आणि नागरिकांनी स्वागत केले असून, यामुळे अपघातांची संख्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त...

### पुणे अत्याचार घटनेत आरोपीवर कडक कारवाई होईल - खासदार नरेश म्हस्के यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण मराठा शाहीसाठी लढले. मराठी शाही, मराठी अस्मिता आणि त्यामध्ये जात-उपजात हे शिवाजी महाराजांना कोणीही वाटून घेऊ नका, चुकीच्या पद्धतीने स्वतःच्या प्रसिद्धीसाठी जो काही प्रकार चालला आहे, निषेध केला पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराजांनी खूप मोठा पराक्रम केला आहे. असे मत खासदार नरेश मस्के यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, आपल्या जीवाची बाजी लावून त्यांनी पराक्रम केला. परंतु, कही स्वतःला जे पोपटपंची करतात. त्यांनी या पोपटपंची बंद कराव्या, नाहीतर महाराष्ट्रातील नागरिक यांना घरात घुसून मारेल. अत्याचाराबाबत परिवहन खातं, गृह खात, राज्य शासन हे सर्वांची जबाबदारी आहे. जो आरोपी असेल त्याच्यावर तत्काळ कारवाई होईल, त्या आरोपी मागे पोलिस लागलेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार या सगळ्यांनी तिथल्या स्थानिक अधिकाऱ्यांना आदेश दिलेत आहेत. लवकरात लवकर तो आरोपी पकडला जाईल. सिडकोच्या अधिकाऱ्यांनाही भेटलो आहे. त्यांच्याशी लवकरात लवकर हे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करतोय, लोकांच्या समस्या दूर होण्याच्या दृष्टीने लोकांना जे पाहिजे त्यांना ते देण्याचे काम करणे हे प्रशासनाचे सरकारचे काम आहे. त्या पद्धतीने सगळ्या गोष्टी होतील. असे मत खासदार नरेश म्हस्के यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### चक्क जिल्हा परिषदेचीच तब्बल ५७ कोटी रुपयांची फसवणूक



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरात चक्क जिल्हा परिषदेचीच तब्बल ५७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचं प्रकरण समोर आलंय. एका अज्ञात व्यक्तीने जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या बनावट खात्याचा बनावट चेक आणि स्टॅम्प बनवून त्यावर खोटी सही करून ही फसवणूक केलीय. यामध्ये एकूण ५७ कोटी ४ लाख ४० हजार ७८६ रुपयांचा गंडा घालत मुंबईतील बँक खात्यावर पैसे वर्ग करण्याचा प्रयत्न उघड झालाय. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जिल्हा परिषदेच्या शाखेतील तीन खात्यांमधून बनावट चेक वटविण्याच्या प्रक्रियेत होते वेळीच वित्त विभागाच्या प्रशासनाने पत्रव्यवहार केला आणि पुढील प्रक्रिया थांबवली. त्यामुळे सुदैवाने ही रक्कम सुरक्षित असल्याचं सांगण्यात आलं आहे. याप्रकरणी अज्ञाताविरोधात कोल्हापूरच्या शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालाय. याबाबतीत अद्याप पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष डोके यांनी सांगितलंय.

### जालन्यात पोलिसांनी घेतली पोलीस अधीक्षक कार्यालयात वाळू माफियांची परेड

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** दिनांक २७ गुरुवार रोजी एक वाजेच्या सुमारास जालन्यात पोलिसांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात वाळू माफियांची परेड घेतले. जालना जिल्ह्यातील जालना आणि भोकरदन मधील सुमारे ३० वाळू माफियांकडून पोलिसांनी बांधपत्र भरून घेतलेत. यावेळी जालन्याच्या पोलिस अधीक्षक कार्यालयात अप्पर पोलीस अधीक्षकांनी वाळू माफियांना सज्जड दम देत अवैध वाळू चोरी, वाहतूक व वाळू उपसा तातडीने थांबवण्याच्या सूचना केल्या आहेत. पुन्हा जर अवैधरित्या वाळू उपसा आणि वाळू वाहतूक केल्यास तडीपार करण्यात येईल असा इशाराही पोलिस अधीक्षकांनी दिलाय. दरम्यान, जालना आणि भोकरदन मधील सुमारे ३० वाळू चोरी, वाहतूक असे गुन्हे असणाऱ्या आरोपींना अचानक पोलिस अधीक्षक कार्यालयात बोलावून घेतल्याने वाळू माफियांत एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, आता पर्यंत वाळू चोरी आणि वाहतूक करणाऱ्या १० वाळू माफियांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलं असून त्यांच्यावर विविध कलमान्वये कारवाई करण्यात आलीय. त्याच अनुषंगाने जर पुन्हा वाळू माफियांनी अवैध वाळू चोरी किंवा वाहतूक केल्यास त्यांच्यावर वर प्रतिबंधक कारवाई करण्याचा इशारा पोलिस अधीक्षकांनी दिलाय. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक करिश्मा चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव, पोलिस निरीक्षक संदीप भारती, पोलिस निरीक्षक सुरेश

# आ. सिद्धार्थ खरात यांनी शिवसैनिकांसह अनुभवला छावाचा थरार




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल इतिहास संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे तर, देशाला माहित आहे. मात्र, धर्मरक्षक, स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना आयुष्यात किती यातना सहन कराव्या लागल्या. स्वराज्यासाठी किती खस्ता खाव्या लागल्या याचा इतिहास छावा या चित्रपटात दाखवण्यात आला आहे. अल्पावधीतच प्रचंड लोकप्रियता मिळवलेल्या छावा चित्रपट पाहण्याचा मोह आमदार सिद्धार्थ खरात यांनाही आवरला नाही. त्यांनी असंख्य शिवसैनिकासह मेहकर येथील चित्रपटगृहात जाऊन छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेला छावाचा थरार अनुभवला.तर छावा चित्रपटातील काही प्रसंगांनी त्यांना थक्कही केले असे मत यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास महाराष्ट्रालाच नव्हे तर, संपूर्ण देशाला माहित आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा पराक्रम अनेकांना माहीत असला तरी छत्रपती संभाजी महाराजांना आयुष्य जगताना किती यातना सहन कराव्या लागल्या. याबाबत मात्र, बहुतांश लोकांना माहिती नाही. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेल्या छावा या चित्रपटाद्वारे छत्रपती संभाजी महाराजांचे आयुष्यातील कठीण प्रसंग दाखवण्यात आले आहेत. त्याचबरोबर क्रूर औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचे किती छळ करून मारले याचा प्रसंग चित्रपट पाहिल्यानंतर मन हे लावणारा आहे. हा प्रसंग पाहिल्यानंतर स्तभ होणारे मन छत्रपती संभाजी महाराजांची स्वराज्या प्रति असलेल्या निष्ठा दाखवून देणारे एक मूर्तीमंत उदाहरण आहे असे बोलले जात आहे. महाराजांचा हा जाज्वल इतिहास छावातून दाखविला जात आहे. तर, अल्पावधीतच छावा चित्रपटाने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांनीही २६ फेब्रुवारी रोजी मेहकर येथील चित्रपट गृहात आपल्या असंख्य शिवसैनिकासह छावा चित्रपटाचा आनंद घेतला. मात्र चित्रपटातील काही प्रसंग हे मन हेलावून गेले असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.

### फितुरीची कीड आजही कायम

इतिहासामध्ये जयचंद राजा व पृथ्वीराज चव्हाण हे हिंदू राजे होते. मात्र, जयचंद राजाला पृथ्वीराज चव्हाण यांचे राज्य मान्य नव्हते. त्यामुळे जयचंद राजाने फितूर केली. मोहम्मद घौरीला भारतावर आक्रमण करण्याचे आमंत्रण दिले आणि भारतावर चालून येण्याचे सांगितले.त्याचबरोबर इंग्रजांना सुद्धा भारतीय लोकांनीच मदत केली. तेव्हाही फितुरी झाली. छत्रपती संभाजीराजांचे शौर्य कोणी थांबवू शकत नव्हते.त्यामुळे त्यांच्यासोबतही फितूर झाली आणि त्यांना पकडून देण्यात आले. सध्याच्या राजकारणातही अशीच फितुरी सुरू आहे. हिंदुत्वाचा रक्षणासाठी उभ्या राहिलेल्या शिवसेनेच्या संदर्भातही अशीच फितुरी झाली आहे. काही विचारांनी शिवसेना फोडली आहे. फितुरी ही तत्व आहे. फितूर झाल्यावर मोठमोठ्या सत्ताही उलथून पडल्या आहेत.महाराष्ट्रात तेच चालू आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा शेवट हा काळीज पिळून ठेवणार आहे. असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले. तसेच इतिहासकारांना धमक्या दिल्या जात आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आहे. झुंडशाही महाराष्ट्रात आली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे विद्याविभूषित व सुसंस्कृत आहेत. त्यामुळे ते अशा प्रकाराला थारा देणार नाहीत असे मत व्यक्त आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.तसेच शिवसेनेमध्येही हिच फितुरी झाल्याचे मत व्यक्त केले. छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यावर असलेल्या छावा चित्रपटातून आपल्या राजाचा इतिहास जाणून घेतला.तसेच यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या शिवसैनिकांनी सुद्धा छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन कार्यावर मत व्यक्त करत चित्रपटातून अंगावर काटे उभे राहतात असे सांगितले.

### छत्रपती संभाजीराजांनी मोघलांना जेरीस आणले

छत्रपती शिवाजी महाराज यांनी शून्यातून विष्व निर्माण केले आहे. रयतेवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात पेटून उठून स्वराज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांना उभे केलेल्या स्वराज्याला साजेसे व त्यांच्या कार्याला साजेसे असे काम छत्रपती संभाजी महाराजांनी केले आहे. तब्बल नऊ वर्षे मोगलाना जेरीर आणणारे छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास अत्यंत शौर्याचा आहे. संभाजीराजांना कैद झाल्यानंतर त्यांची ज्याप्रमाणे क्रूर हत्या करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण मराठा पुन्हा पेटून उठला आणि नव्या मराठा साम्राज्याला प्रारंभ केला. अशी प्रतिक्रिया आमदार सिद्धार्थ खरात यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित असलेल्या छावा चित्रपट पाहिल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त केली. त्याचबरोबर संभाजी महाराजांचा शेवट हा अत्यंत भयानक आहे. मात्र, संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची अहुती दिली आणि शेवटच्या श्वासापर्यंत केवळ रयतेचे हित जोपासले.

## विविध वृत्त...

### शासन लवकरच वाळू वाहतुकीचे नवीन धोरण आणणार ; मंत्री संजय सावकारे यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** भंडारा जिल्ह्यात सहाशेच्यावर जलजीवन मिशनची कामे मंजूर असून, तिनशे कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. तर, उर्वरित कामे प्रगती पथावर आहेत. मध्यंतरी निधीच्या अभावामुळे ही कामे रखडली. मात्र, नवीन बजेटमध्ये निधीची तरतूद करण्यात आली असून, लवकरच ही कामे पूर्ण होतील. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतूक होत असताना संबंधित विभगसुद्धा नियमित कारवाई करीत आहे. वाळू संदर्भात शासन लवकरच वाळू वाहतुकीचे नवीन धोरण आणणार आहे, अशी माहिती वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली. यावेळी पुढे बोलताना म्हणाले की, पुणे अत्याचार येथील घटना ही निंदनीय आहे. समाजातील महिलाच नाही तर, पुरुषांनाही सुरक्षित जीवन जगता आले पाहिजे, देशात अनेक गुन्हे होत असतात, पोलिस त्यांच्यावर कारवाई करते.मात्र, तरीसुद्धा गुन्हे घडतात. लोकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. अशी माहिती वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

### नागपुरात संजय राऊतांविरोध व्हेरायटी चौकात शिवसेनेचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** संजय राऊत यांनी शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांच्या बद्दल केलेल्या वक्तव्या विरोधात आज नागपुरात शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी जोरदार आंदोलन केले. नागपुरात व्हेरायटी चौकात महिला पदाधिकारी यांनी एकत्र येत आंदोलन केले. यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी जोरदार हल्लाबोल चढवला, संजय राऊत आम्हाला ज्ञान पाजू नका, रोजचा भोंगा बंद करा अशा घोषणा दिल्या. यावेळी बॅनरवर चप्पल मारत संताप व्यक्त केला आणि महिलांचा सन्मान राखा असाही इशारा दिला यावेळी महिलांनी दिला आहे.

### ३ मार्चला लोकशाही दिन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार मार्च महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ३ मार्च २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी कळविले आहे.

### कार व दुचाकीचा खामगाव बोथा मार्गावर अपघात; अपघातानंतर दुचाकीने घेतला पेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खामगाव-बोथा मार्गावर कार व एका दुचाकीचा अपघात झाला आहे. यात दुचाकीने पेट घेतला असून, यात दुचाकीस्वार बचावला आहे. खामगाव-बोथा मार्गावर थोड्या वेळापूर्वी एक अपघात झाला. हा अपघात ऐवढा भिषण होता की, धाड येथील अयान खान आपल्या दुचाकीवर जात असतांना कार चा अपघात होताच दुचाकीने पेट घेतला. या अपघातात दूचाकीस्वार अयान खान बचावला आहे.



## जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधुन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा वापर प्रत्येकाने संवादासाठी करणे गरजेचे असून मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची असल्याची भावना निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्य 'घेऊ या एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा' हा संदेश देत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, अधीक्षक अजित जंगम तसेच अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे मकरंद आपटे यांनी आर्थिक साक्षरता संदर्भात माहिती देऊन बँकेव्दारे चालवण्यात येणाऱ्या निवृत्त योजना, टर्म प्लॅन, मुलाच्या शिक्षणाकरिता असलेल्या योजना, गुंतवणूक योजना अशा विविध योजनाची माहिती दिली. तसेच बँकेचे व्यवहार ऑनलाईन झाले असून युनो पचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## कार अपघातात तीन जखमी

### समृद्धी महामार्गावरील चॅनेल क्रमांक ३४६.५ वरील घटना



दैनिक आपला विदर्भ

**लोणार :** प्रयागराज येथून मुंबई येथे जात असताना कार चालकाना झोपेची डुलकी लागल्याने झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाले. सदर घटना २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता दरम्यान चॅनेल क्रमांक ३४६.५ मुंबई कॅरिडोर वर घडली. प्राप्त माहितीनुसार एम.एच-४३-बीवाय-६९८१ या क्रमांकाच्या कारने संजय संतोष त्रिपाठी वय ३२ रा.नवी मुंबई हे मित्राच्या कुटुंबासह प्रयागराजवरून नवी मुंबईकडे जात असताना कार चालकाला झोपेची डुलकी लागली. त्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार अगोदर डाव्या साईडच्या क्रॅशबॅरीअरला धडकली व त्यानंतर कार उलटी फिरून उजव्या साईडच्या बॅरीअरला समोरून धडकली. व महामार्गावर आडवी झाली. सुदैवाने यामध्ये पाठीमागून येणारे दुसरे वाहन नसल्याने मोठा अनर्थ टळला. सदर कारमध्ये एकूण ९ प्रवासी प्रवास करीत होते. त्यामधील संजय गुप्ता वय ४०,त्यांची पत्नी सुनीता संजय गुप्ता व ज्योती दिलीप गुप्ता वय ३२ सर्व रा.नवी मुंबई हे गंभीरित्या जखमी झाले. तसेच दिलीप गुप्ता वय ३२,संगीता विनोद गुप्ता वय ३९, विनोद गुप्ता वय ४९, आरव संजय गुप्ता वय २, सार्थक दिलीप गुप्ता वय ४ सर्व रा. नवी मुंबई हे किरकोळ जखमी झाले. जखमींना तत्काळ महामार्ग ॲम्बुलन्सचे डॉक्टर अक्षय विघ्ने, चालक शैलेश दळवी व महामार्ग सुरक्षा बलचे जवान भगवान गायकवाड, सचिन नाईक,अजय पाटील यांच्या मदतीने तत्काळ जालना येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या साह्याने बाजुला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. पुढील तपास पोलीस स्टेशन सिदंखेडराजा करीत आहे.

## वढव ते शेंदुर्जन ३८ किमी रस्त्याचे भूमिपूजन

### मेहकर मतदारसंघात विकास पर्वाला सुरुवात झाली : आ. सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदार संघातील अनेक प्रश्र्नांना आमदार झाल्यापासून हात घातला आहे. दोन महिन्याच्या काळत वढव गावासाठी १० लाख रुपयांचा निधी दिला आहे. आता वढव ते शेंदुर्जन हा लांबीने ३८ किलोमीटरचा तर रुंदीने ७ मीटरचा रस्ता लवकरच पूर्ण होणार असल्याने खऱ्या अर्थाने मेहकर मतदारसंघात विकास पर्वाला सुरुवात झाली, असे प्रतिपादन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

वढव येथे गुरुवार २७ फेब्रुवारी रोजी वढव ते शेंदुर्जन रस्त्याचे भूमिपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, शेंदुर्जन, राजेगाव,सुलतानपूर, वेणी, हिरडव, वढव रस्त्याच्या कामासाठी आपण मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून घेतला आहे. या रस्त्याचे २८ किलोमीटरचे काम मेहकर मतदार संघात असल्याने याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

दरम्यान उबाठा पक्षाच्या तालुकाप्रमुख सौ तारामती जायभाये यांच्या हस्ते आमदार सिद्धार्थ खरात यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच पती विजय सोनुने, नंदकुमार सोनुने, ग्रामसेवक सानप, संतोष वाठोरे, विजय मोरे,अंकुश सोनुने, बद्री सानप, गजानन तनपुरे, मंगेश मोरे, गजानन मोरे, स्वप्नील हाडे, सत्यनारायण वाठोरे, गजानन वाठोरे, नारायण चाटे, डॉ सार्थ खरात,मुक्ताबाई महिला भजनी मंडळ व बारी, महादेव भजनी मंडळ यांच्यासह वढव गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### निधीची कमतरता भासणार नाही

सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची नुकतीच भेट घेतली असल्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले. मतदारसंघातील रस्त्यांच्या प्रश्र्नांवर त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्यांनी सहकार्यची भूमिका दाखवली असून निधीची कमतरता भासणार नाही, असेही आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले.